वर्ष ४४
अंक ५

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

**समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**

मे २०२४
चैत्र / वैशाख
शके १९४६



प्रिय मित्र मैत्रिणींनो,

नवी ही अस्मिता नवी भरारी । नवी क्षितिजे नवी झळाळी ॥ या गाण्याच्या नादात उत्तर अमेरिकेतील सारी मराठी कम्युनिटी BMM 2.0 २०२२-२४च्या अंतिम स्थानकावर - २१व्या बीएमएम कायबे २०२४ अधिवेशनामध्ये - एकत्र भेटण्याच्या तयारीला लागली आहे. सगळीकडे एकच उत्साहाचे वातावरण पसरलेले आहे.

बीएमएम अधिवेशनाची ४४०० तिकीटे विकली गेलेली आहेत. $५०० ची तिकीटे सोल्ड-आऊट आहेत. आता फक्त डोनेशन्स पॅकेजेस आणि प्रीमियर ($७५०) व स्थानिक रहिवाश्यांसाठीची ($३५० food not included/food trucks arranged) तिकीटे उपलब्ध आहेत. ५००० च्या आसपास संपूर्ण अधिवेशन सोल्ड-आऊट होईल.

सर सुनील गावस्कर, राज ठाकरे, गोविंद देव गिरी, गौर गोपाल दास, मुक्ता बर्वे, राहुल देशपांडे, प्रियांका बर्वे, शरद पोंक्षे, भाडीपा, अजय-अतुल, संजीव अभ्यंकर, धनश्री लेले, महेश काळे अशा भारतातून येणाऱ्या नामवंत कलाकारांबरोबर उत्तर अमेरिकेतील २५० हून अधिक कलाकार विविध कार्यक्रम सादर करणार आहेत. अधिवेशनाचा पहिला दिवस म्हणजे बीएमएम फेस्ट! यात उत्तररंग, शाळा, जागतिक मराठी लीडरशीप, CME, बी-कनेक्ट या परिषदा आणि एकांकीका, लघु चित्रपट, मराठी गुणवत्ता या स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

अधिवेशनात सर्व खवय्यांसाठी रुचकर आणि वैविध्यपूर्ण खाद्यपदार्थांची मेजवानी असणार आहे. कधी लग्नाच्या पंगतीतील जिलबी-मठ्ठ्याचा थाट तर कधी शेजाऱ्यांकडील उंधियो-पुरी! कधी मराठमोळी झुणका भाकर तर कधी “काय बे” स्पेशल बकलावा! शिस्तबद्ध आणि वक्तशीर भोजन व्यवस्थेमुळे सगळ्यांचीच मने तृप्त होतील हे नक्की.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे २०२४ अधिवेशन हा महाराष्ट्राबाहेरील मराठी लोकांचा सर्वात मोठा मेळावा! उत्तर अमेरिकेतील आपल्या मराठी कुटुंबाचे घरचे कार्य - सगळ्यांनी यायलाच पाहिजे! लवकर तिकीटे घ्या @ bmm2024.org/register

आता दोन शब्द बीएमएम प्रकल्पांबद्दल लिहितो. बीएमएम २.० च्या २०२४ युवा इंटर्नशिप प्रकल्पात २२५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला आहे. मराठी शाळेचे महाराष्ट्र शासनाबरोबर काम चालू आहे - यंदा १२०० हून अधिक विद्यार्थी परीक्षेला बसत आहेत. परीक्षा म. शा./बालभारती मान्य अभ्यासक्रमावर आधारित आहेत. आपण अमेरिकन शासनाकडून देखील बृहन्महाराष्ट्र मंडळ मराठी शाळा प्रकल्पाला मान्यता मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहोत. यातून आपल्या विद्यार्थ्यांना कॉलेज क्रेडिट मिळणे सोपे होईल. बीएमएम पौरोहित्य प्रशिक्षण प्रकल्पात ५० हून अधिक विद्यार्थी आहेत. त्यात मी पण एक विद्यार्थी आहे आणि मला एप्रिल मध्ये एक मुंज सांगण्याचा योग आला! या अनुभवातून मला असे वाटते की आपल्या शाळेत आज ३००० विद्यार्थी आहेत - मराठी शाळा, युवा इंटर्नशिप, मुंज/संस्कार व बी-कनेक्ट (नोकरी) या चार प्रकल्पांच्या एकत्रित आणि योग्य आखणीने आपल्या पुढल्या पिढीचे भविष्य शैक्षणिक, सांस्कृतिक, वैचारिक आणि आर्थिक दृष्ट्या समृद्ध होईल. अधिवेशनामध्ये बीएमएम २०२४-२६ कार्यकारिणीच्या निवडणूका होणार आहेत. तुम्ही सर्वजण बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या या सगळ्यात महत्वाच्या यंत्रणेत - लोकशाही तंत्रामध्ये - भाग घ्याल आणि पुढील २ वर्षांसाठी सर्व जागांसाठी योग्य उमेदवार निवडून द्याल याची मला खात्री आहे. अजून आपल्याला खूप काम करायचे आहे!

आता सांख्य-कारिकेतील दोन श्लोकांनी थांबतो:

प्रकृते: सुकुमारतरं न किन्चिदस्तीति मे मतिर्भवती । या दृष्टास्मिती पुनर्न दर्शनमुपैती पुरुषस्य ॥ सां.का. ६१ ॥

तस्मात्न बद्ध्यतेऽद्धा न मुच्यते नापि संसरति पुरुषः । संसरति बद्ध्यते मुच्यते च नानाश्रया प्रकृतिः ॥ सां.का. ६२ ॥

माझे असे मत आहे कि प्रकृतीहून नाजूक/सौम्य काही नाही. प्रकृती “मी पाहिले” हे जाणल्यावर पुरुषाच्या नजरेआड होते. म्हणून खरतर पुरुष बंधनात नसतो किंवा मुक्त होत नसतो किंवा स्थानांतर करत नसतो. अनेकविध निर्मितीचा आधार देणारी प्रकृती बंधनात असते, मुक्त होत असते किंवा स्थानांतर करत असते.

शुभेच्छा,

संदीपदीक्षित

संदीप दीक्षित, *अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ २०२२-२४*
+1-216-926-6696 sandeep.dixit@bmmonline.org
x.com/sandeepsdixit |
facebook.com/sandeepsdixit1 |
instagram.com/sandeepsdixit1
www.bmmonline.org | bmm2.org/app

#bmm2 #bmm2024 #communityCentricBMM #mandalMember #vruttaSubscriber

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै . विष्णु वैद्य, कै . शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर



अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
BMM Treasurer - Rajan S Pednekar
20611 Whitebud CT. Tampa FL 33647
Ph- 813-546-1330
Email: Rajan.Pednekar@bmmonline.org


**वर्गणीचे दर**:- $25/ year
Subscription payment is accepted online by Paypal:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription


**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50


वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२ - २०२४)**

**मताधिकार असलेले सदस्य**

| | |
|---|---|
| अध्यक्ष: | संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो |
| सचिव: | अजित नातू, सॅक्रामेंटो, कॅलिफोर्निया |
| कोषाध्यक्ष: | राजन पेडणेकर, टॅम्पा बे, फ्लोरिडा |
| सदस्य: | अमर उन्हेकर, लिविंग्स्टन, न्यु जर्सी |
| | सविता मोरे, वॉशिंग्टन |
| | मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा |
| | प्रसाद पानवळकर ऑस्टिन, टेक्सस |
| | विराज राऊत, सॅन होजे, कॅलिफोर्निया |

**नियुक्त सदस्य**

| | |
|---|---|
| माजी अध्यक्ष: | विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय |

**विश्वस्त समिती**

| | |
|---|---|
| अध्यक्ष : | मोहित चिटणीस, सिऍटल, वॉशिंग्टन |
| सदस्य: | नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय |
| सदस्य: | सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट |
| प्रकाशक: | बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका |



**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


## या अंकात


| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| राम धनु | ३ |
| प्रभात सिने दर्शन | ५ |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन रूपरेषा | ७ |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन रूपरेषा | ८ |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन रूपरेषा | ९ |
| ललत ते बागेश्री - एक सांगितीक आठवण | १० |
| क्लिक | ११ |
| जाहिरात | १२ |
| जाहिरात | १३ |
| जाहिरात | १४ |
| जाहिरात | १५ |


## संपादक समिती


अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
राजन पेडणेकर



हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा.

Email - Vrutta@Bmmonline.org

आलेल्या प्रतिक्रिया पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. **शब्दमर्यादा: १०० शब्द.**



# ‘राम धनु’ - अर्चना जोगळेकर




*२७-३० जून दरम्यान सॅन होजे, कॅलिफोर्निया येथे होणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या २०२४ अधिवेशनामध्ये अर्चना जोगळेकर एक नवा कोरा मनमोहक नृत्याविष्कार ‘राम धनु’ घेऊन येत आहेत. आम्ही तर खूप उत्सुक आहोतच पण आपणही सगळे मंत्रमुग्ध होण्यासाठी सज्ज असाल आणि म्हणूनच त्यांच्याशीच थेट संवाद साधून, त्यांच्याविषयी आणि या कार्यक्रमाविषयी जाणून घेण्याचा हा एक प्रयत्न.*

**अर्चना ताई, या वर्षी बृहन महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाला ‘राम धनु’, हा विशेष कार्यक्रम तुम्ही घेऊन येत आहात. तो बघायला आम्ही प्रेक्षक खूप उत्सुक आहोत. या कार्यक्रमाविषयी आपल्या प्रेक्षकांना काय सांगाल?**

राम धनु हा प्रयोग BMM अधिवेशनात सादर करण्यासाठी मी खूप उत्सुक आहे. BMM च्या प्रकाश भालेराव ‘काकांनी’ माझे नृत्य २०२२ च्या ‘सवाई गंधर्व फेस्टिवल’ मध्ये पाहिले होते. त्या वेळी त्यांनी मला माझ्या नृत्याचे समीक्ष रिस्पॉन्स दिला होता - बिरजू महाराजांनंतर प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे नृत्य मी आज बघितले! मला जेव्हां बृहन महाराष्ट्र मंडळ अधिवेशनाचे कार्यक्रम सादर करायचे आमंत्रण आले तेंव्हां BMM साठी आधी एक वेगळा प्रयोग करायचे मनात होते. सर्व पक्के होता होता जानेवारी २०२४ उजाडला. वेळे अभावी ते करणे मुश्किल दिसत होते. भालेराव काकांनी "तुम्ही जे कराल ते अतिशय उत्कृष्ट असेल, आम्हाला तुमचा प्रयोग हवाच" असे सांगितल्यावर मात्र त्यांचा माझ्यावरचा एक कलाकार म्हणून जो विश्वास होता तो खूप भावला आणि मी राम धनु हा नृत्य प्रयोग सादर करायचे निश्चित केले. ‘कथा करे सो कथक केहेलावे’ - थोडक्यात हा प्रयोग म्हणजे रामायणाचे कवडसे कथकच्या माध्यमातून असे म्हणता येईल. ह्या नृत्य रचनेतून रामायणाच्या अनेक लोकप्रिय तसेच दुर्मिळ रचना दाखवल्या जाणार आहेत. ह्या प्रयोगात कथक आणि अभिनयाची उत्तम डिमेंशन आहेच, त्याच बरोबर उत्तर प्रदेशच्या गमती जमती व रामायणाचे असे पैलू जे प्रेक्षकांनी आधी पाहिले नसतील, तेही समाविष्ट केलेले आहेत. १० कलाकारांनी सजलेल्या या नृत्यरचनेमध्ये नृत्याबरोबरच एक अभ्यासात्मक ट्रॅक पण समांतर चालू राहील. माझा रोल म्हणाल तर कधी ग्रुप मध्ये मला एखादे कॅरॅक्टर करतांना पाहाल तर कधी सोलो मध्ये अनेक पात्र रंगवताना पाहाल. प्रयोगाचा ‘क्लायमॅक्स’- म्हणजेच राम-रावण युद्ध! शेवटच्या २५ मिनिटांत या ‘solo performance’ मध्ये मी ८-१० विविध पात्रे समाविष्ट करणार आहे. ह्या परफॉर्मन्सची range म्हटले तर यात अनेक प्रकारचे रस आणि भावना - जसे बिभित्स, वीर, रौद्र, शोक, करुण इ. दर्शविलेले आहेत. ‘राम धनु’ हे पद बसवण्या अगोदर ह्या विषयाचा मी खूप सखोल अभ्यास केला आहे - अशी ही उत्तम डेप्थ असलेली आणि multi-dimensional नृत्य रचना, कथक जगतामध्ये पहिल्यांदाच बसवली आहे. ही unique रचना BMM च्या रसिकप्रिय प्रेक्षकांसमोर सादर करायला मी खूपच उत्सुक आहे.

**कथक नृत्यांगना (enthusiast) ते अभिनेत्री ते गुरु - हा तुमचा एक trailblazing प्रवास आहे. ह्या प्रवासाबद्दल काही विशेष तुम्ही सांगू इच्छिता?**

मी मे १९९९ मध्ये लग्न करून अमेरिकेत आले. त्या वेळी मी भारतामध्ये नृत्यांगना व अभिनेत्री म्हणून प्रसिद्धीच्या शिखरावर होते. अनेक भारतीय, आंतरराष्ट्रीय आणि मानाच्या संगीत-नृत्य महोत्सवांमध्ये मला विशेष कलाकार म्हणून बोलावले जायचे. अशा ह्या व्यस्त जीवनशैली नंतर अमेरिकेत मला स्वत:साठी वेळ मिळाला - रियाझ करायला, आवडी-निवडी जपायला. ह्या काळात मला २००९ च्या अधिवेशनात मुकुंद कुटे यांच्या सहकार्याने २ सफल प्रयोग करण्याचा योग आला. एक विशिष्ट गोष्ट म्हणजे ह्या प्रयोगांमध्ये माझ्या आफ्रिकन अमेरिकन आणि व्हाईट कॉकेशियन स्टुडंट्सचा देखील समावेश होता. तसेच पुढे प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी मधून ३ सेमेस्टर्स नृत्य शिकवण्याचे आमंत्रण आले.

मी अर्चना आर्टस् स्थापित करून व सादरीकरणातून माझे नृत्य चालू ठेवले आहे. अमेरिकेत अर्चना आर्टस् च्या न्यू जर्सी आणि बोस्टन मध्ये शाखा आहेत. ह्या सर्व शाखांमध्ये माझ्या आईने १९६३ मध्ये भारतामध्ये स्थापित केलेल्या ‘अर्चना नृत्यालया’चीच तत्त्वे, नैतिकता आणि पाया जपले जातात. US मध्ये मी माझी faculty टीम उभी केली. टीचर्सना मी मायक्रोस्कोपिक ट्रेनिंग देते. त्या रीतीने

नृत्य शिक्षण व्यवस्थित दिले जाते. अर्चना आर्टसचे zoom वर उत्तम classes चालू आहेत.

अर्चना आर्टस् हे 'सामवेद' परीक्षा मंडळाशी संलग्न आहे, ज्यामध्ये उत्तर अमेरिकेतील नृत्य, गायन, वाद्य संगीत इत्यादींसाठी खास तयार केलेल्या अभ्यासक्रमाचा समावेश आहे. सामवेद हे 'माध्यम' नावाच्या संस्थेशी संबंधित/ संलग्न आहे. माध्यमची स्थापना मी भारतीय शास्त्रीय कलांचा प्रचार, प्रसार, रुची वाढवण्यासाठी केली आहे. सामवेद हा एक्झॅम बोर्ड देखील त्यासाठीच स्थापला गेला, ज्यात कलांच्या परीक्षा, खऱ्या अर्थाने कस लावून घेतल्या जातात. 'माध्यम' आणि 'सामवेद' मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षा अत्यंत मेहनती आणि गुणात्मक स्वरूपाच्या असतात. अमेरिकेत अनेक गायन-वादन-नृत्याच्या संस्था-शिक्षक सामवेदशी संलग्न आहेत.

**तुमच्या आई, आशाताई जोगळेकर ह्यांचा तुमच्या आयुष्यावर खूप मोठा प्रभाव असेल! तुमच्या आईंबद्दल काही सांगाल?**

आई २००६ साली गेली. ती गेल्यावर, माझा आधारस्तंभ हरपला, वाकून नमस्कार करायला पाय नाहीसे झाले. त्याच पायांच्या शोधात, तिच्या स्मृतीप्रित्यर्थ मी 'गुरु वंदना' हा पुरस्कार सुरु केला. लोकाभिमुख अशी तुमची कला असली पाहिजे - अशी माझ्या आईची philosophy होती. तिचे हे संस्कार माझ्यात मुरलेले आहेत. माझ्या प्रत्येक सादरीकरणात, माझी कला, सामान्यातली सामान्य व्यक्ती, जिला क्लासिकलचे ज्ञान नाही, तिलाही मंत्रमुग्ध करते. आईने ५० वर्षे नृत्य शिकवले. अर्चना नृत्यालयातून बाहेर पडलेले विद्यार्थी आज सफल आणि नावारुपाला आलेले डान्स directors, reality shows मध्ये judges आहेत. उदा. फुलवा खामकर, उर्मिला कोठारे, वैदेही परशुरामी.

आई माझी गुरु होती, आणि मी तिची पहिली विद्यार्थिनी! जशी वर्षे उलटत गेली तशी ही भूमिका बदलत गेली! एक विशेष आठवण म्हणजे आई जेव्हा माझ्या बाळंतपणासाठी US ला आली होती तेव्हा तिने माझ्याकडून अथर्वशीर्ष नृत्य रूपात शिकायची इच्छा व्यक्त केली. आमची भूमिका आता मी गुरु, व आई विद्यार्थिनी अशी झाली होती! अथर्वशीर्ष ही नृत्यरचना मी तिला अगदी microscopic detail मध्ये शिकवली! रचना शिकून झाल्या वर तिने म्हंटले "असे नृत्य मला कुठल्याच गुरुने शिकवले नव्हते". तिचे हे शब्दच माझ्यासाठी सर्वोच्च पारितोषिक आहे.

**अप्रतिम नृत्यांगना, अभिनेत्री आणि आता गुरु असा तुमचा जग लौकिक आहे- ह्या व्यतिरिक्त अजून काही छंद जे आम्हाला माहिती नसतील?**

लिखाण हे आमच्या घराण्यात पिढीजात आहे. माझे वडील लिखाण करीत, माझी आजी आईची आई - सुरेखा जोशी नाटके लिहीत असत. तिने संगीत नाटकात, बालगंधर्वां बरोबर काम केले आहे. मलाहि हे आनुवंशिक आले आहे. मी खंड जातीच्या दोन कविता प्रकाशीत केल्या आहेत, १. <u>जब कान्हा कि बांसुरी बाजत</u> आणि २. <u>मोत्याचा मोह</u>. पहिली कविता २००० साली लिहिली होती पण प्रकाशित आत्ता इतक्यात केली आहे. मी अजून एक कविता लिहिली आहे जी लवकरच प्रकाशित करायची इच्छा आहे. ही कविता एका संत कवींच्या संदर्भातली सत्य घटनेवर आधारित आहे. परमात्मा आणि प्रेम ह्या वर खूप गमतीशीर पद्धतीने सांगितले आहे.

काव्या व्यतिरिक्त मला दिग्दर्शनाची पण आवड आहे. १९९६ आणि १९९७ मध्ये माझ्या २ मालिका दूरदर्शन व DD मेट्रो वर प्रकाशित झाल्या होत्या - साम्राज्य, ही एक हिंदी मालिका असून, तिची कथा, पटकथा, संवाद, दिग्दर्शन अँड production मी केले होते. ह्या मालिकेत विक्रम गोखले, टॉम आल्टर, सुधीर दळवी, सुधीर पांडे, नीना कुलकर्णी होते. दुसरी सीरिअल व. पु. काळे यांच्या कथे वर आधारित, अवघाचि संसार डायरेक्ट केली होती, ह्या मध्ये विक्रम गोखले, सविता प्रभुणे, मोहन जोशी, प्रशांत दामले, मोहनदास सुखटणकर होते. भविष्यात अजून बऱ्याच माध्यमातून दिग्दर्शन करायचे मनात आहे!

अर्चना ताई, बृ. म. मं वृत्त विभागाकडून तुम्हाला आणि तुमच्या सगळ्या चमूला अनेकोत्तम शुभेच्छा! अर्चना जोगळेकर यांच्या प्रतिभेची जादू आणि बरेच काही अनुभवण्याची ही संधी गमावू नका!

**कोमल कुलकर्णी, ट्रम्बल, कनेटिकट**
komal.kulkarni@bmmonline.org

**अपर्णा कोळेकर, बफेलो, न्यू यॉर्क**
aparna.kolekar@bmmonline.org

**राशिभविष्य : मे २०२४**
**१ मेला गुरु मेषेतून वृषभेत प्रवेश करेल. गुरु मोठा ग्रह असल्याने ह्या गुरुपालटामुळे मोठ्या उलाढाली घडतील.**
**अजय तनखीवाले**
https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## ‘प्रभात सिने दर्शन’ - डॉ मीना नेरुरकर




**नीता:** *सॅन होजे येथे होणाऱ्या BMM2024 च्या अधिवेशनात डॉ मीना नेरुरकर यांची मूळ कल्पना, लेखन, नृत्य दिग्दर्शन, व त्यांच्या नेतृत्वाखाली घडवून आणलेले ‘प्रभात सिने दर्शन’ चा प्रयोग जून २९ ला सादर होणार आहे. हा प्रेक्षकांसाठी एक आगळाच अनुभव असणार आहे. तो का व कसा? हे जाणून घेण्यासाठी आम्ही, मीनाताई नेरुरकर यांच्याशी प्रत्यक्ष बोललो व आमच्या वाचकांसाठी थोडावेळ पडद्यामागे डोकावून पाहिले -*

**विदुला:** मीना ताई - ह्या tri-state area (NY, NJ, PA) मधे तुम्हाला कोण ओळखत नाही? गेले कित्येक वर्षे तुम्ही अभिनय, संगीत, नृत्य आणि साहित्य क्षेत्रात भरपूर योगदान दिलंत. तर बृहन महाराष्ट्र मंडळाच्या वृत्ताच्या वाचकांसाठी, तुमच्या तोंडून याबद्दल आणखीन जाणून घ्यायला आवडेल -

तुमची entertainment - नृत्य/नाट्य/संगीत ह्या कला क्षेत्रातील आवड कधी व कशी चालू झाली ?

**मीनाताई:** माझ्या आईला कलाक्षेत्राची, नृत्य, संगीत याची आवड होती. पण त्या काळात ती लहान गावात राहायची. तिथे तिला तिची आवड जोपासता आली नाही. नंतर मुंबईला आल्यावर तिने मला ती संधी उपलब्ध करून दिली. मी लहान असताना म्हणजे अगदी पाच वर्षाची असल्यापासून नृत्य शिकायचे. आता ऐकून आश्चर्य वाटेल पण मी सोमवारी कथक, बुधवारी भरतनाट्यम आणि शुक्रवारी मणिपुरी असे तीनही प्रकार एकावेळी शिकत होते! शिवाय शाळा आणि बाकीच्या activities असायच्याच आणि हे ६-७ वर्ष चालू होत. गाणं शिकवायलाही आमच्या नात्यातले एक ज्येष्ठ गायक यायचे पण माझ्या तोंडातून अगदी ‘आ’ पण निघायचा नाही. त्यावेळी गाणं न शिकल्याचं आता वाईट वाटतं पण तेव्हा मला खेळणं, नाच करणं अशा गोष्टी आवडायच्या आणि एका ठिकाणी बसून गाणं शिकणं तेव्हा फारच अवघड होत. आता वाटत तेव्हा शिकले असते तर किती बरं झालं असतं.

मी मुंबईला बालमोहन शाळेत होते तिथे कलागुणांना खूप प्रोत्साहन मिळायचं आणि नृत्यामुळे मला शाळेत आणि नंतर मेडिकल कॉलेजमधेही स्टेजवर खूप संधी मिळाल्या आणि मला लाइमलाईटमधे ठेवलं. कॉलेजमधे आणखीन एक नृत्य कलाकार होता. आमचे रती-मदन, शंकर-पार्वती, कृष्ण-राधा असे नृत्य केलेले प्रसिद्ध झाले. एकदा स्टेजवर असण्याची सवय लागली की ते थांबवणं फार अवघड असत. त्यावेळी मला कला क्षेत्रातच काम करावं असं वाटायला लागलं पण माझ्या आईनी “तुला डॉक्टर व्हायलाच पाहिजे” असं सांगितलं. त्यामुळे मी डॉक्टर होऊन शिवाय या बाकीच्या गोष्टी करायला लागले.

**नीता:** माझ्या माहिती प्रमाणे - कला क्षेत्रातील प्रगती अमेरिकेत आल्यावर जास्त भरभराटीला आली आणि तुमच्या कलेमुळे - पूर्ण उत्तर अमेरिकेतच नाही, तर भारतातही तुम्ही अमेरिकन-मराठी व्यक्तिमत्वाला मानाचे स्थान दिले!

**मीनाताई:** अमेरिकेत आल्यावर आधी मराठी मंडळाच्या कार्यक्रमात भाग घेऊ लागले. मग १९८९ मध्ये, ‘माझे माहेर पंढरी’ हा कार्यक्रम मी स्वतः बसवला. तो लोकांना इतका आवडला आणि त्याच्या व्हिडीओजचा भरपूर खप झाला. त्यामुळे भारतातील कलाकार/पाहुणे इकडे आले की, तो व्हिडिओ अभिमानाने त्यांना दाखवून, येथील लोकं सांगत - बघा आमच्या अमेरिकेत किती छान कार्यक्रम झाला! नंतर मी आणखीन काही कार्यक्रम केले व प्रसिद्धी वाढली. पुढे मी ‘सुंदरा मनामध्ये भरली’ हा कार्यक्रम केला. शिकागो मध्ये तो शो श्री. माधव गडकरी व श्री. हृदयनाथ मंगेशकर यांनी बघितला आणि लगेच भारतात सादर करायला बोलावलं. तिथे गेल्यावर श्री. मोहन वाघ यांनी तो व्यवसायिक पातळीवर चालू केला. ३ वर्षात १०० प्रयोग झाले. मी काहीही न ठरवता हे आपोआप घडत गेलं आणि मला एका पाठोपाठ एक संधी मिळत गेल्या.

**नीता:** तुम्ही वैद्यकीय व्यवसाय, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि नृत्य/नाट्य/संगीत ह्या कला क्षेत्रातील वाटचाल, ह्या सगळ्याची सांगड कशी काय घातली?

**मीनाताई:** जेव्हा कलेचं तुम्हाला पॅशन असतं, तेव्हा तुम्ही वेळातून वेळ काढताच. ह्या सगळ्या प्रॅक्टिसेस विकेंडला व्हायच्या. उत्साह होता त्यामुळे कठीण नाही वाटलं. आणि तो उत्साह अजूनही कायम आहे. मी आत्ता भारतात जाऊन पहिली मराठी-अमेरिकन वेब सिरीज संपवून आले आहे.

**विदुला:** तुम्ही या आधीही BMM अधिवेशनात तुमची कला सादर केलेली आहे. त्याच्या काही आठवणी ?

**मीनाताई:** हो मी बऱ्याच अधिवेशनात कार्यक्रम केले आहेत. मला स्वतःलाच नवीन काहीतरी करायला आवडतं त्यामुळे मी जवळपास दर अधिवेशनाला प्रपोजल पाठवते आणि नवीन असल्याने, बऱ्याचदा संधी मिळते. १९९९ साली पण अधिवेशन सॅन होजेला होतं. त्यावेळी मी दर महिन्याला चार दिवस तिथे जाऊन त्यांचा ओपनिंग सेरेमनी बसवून आले.

**नीता:** BMM2024 Convention च्या कार्यक्रमाबाबत, आत्ता ह्या क्षणी तुम्ही प्रेक्षकांना काय सांगू इच्छिता? या कार्यक्रमाची कल्पना कशी सुचली? ह्या कार्यक्रमाचे स्वरूप कसे असेल?

**मीनाताई:** प्रभात फिल्म कंपनीचा इतिहास व प्रवास फारच काळाच्या पुढचा आहे. १९३३ ते १९४४ च्या काळात त्यांनी एवढे एकाहून एक उत्तम सिनेमे बनवलेले आहेत. त्याच्यातील ८ सिनेमांची लाईव्ह झलक प्रेक्षकांना बघायला मिळेल. प्रत्येक सिनेमाच्या १५ मिनिटाची झलक दाखवली जाईल व ती बघून प्रेक्षकांना संपूर्ण सिनेमा बघितल्याचा आनंद मिळणार आहे. ह्या लाइव ॲक्टची थिम ब्लॅक अँड व्हाईट असणार आहे आणि स्टेजवर अभिनय करणारे कलाकार पूर्वीच्या कलाकारांसारखे स्वतः गाणार सुद्धा आहेत. ह्या ८ (प्रत्येकी १५ मिनिटे) सिने दर्शनाचे मोती एकत्र गुंफणार आहे ते, पु. ल. देशपांडे ह्यांनी लिहिलेले निवेदन. त्याच्यामुळे प्रेक्षकांना तो सिनेमा परत बघितल्याचे समाधान मिळणार आहे.

**विदुला:** 'प्रभात सिने दर्शन' बघून प्रेक्षकांना काय नवीन अनुभवायला मिळेल? कार्यक्रमासाठी ह्या विषयाची निवड करण्यामागे काय विचार केला होता?

**मीनाताई:** मी म्हणाले तसं मला नेहेमीच काहीतरी नवीन करायची इच्छा असते आणि मला अगदी माझ्या मनासारखा कार्यक्रम करता यावा म्हणून मी लिहिते आणि मीच करते. प्रभातला कलाविश्वात खूपच महत्त्वाचं स्थान आहे. प्रभातच्या गाण्यांचा कार्यक्रम मी मागे ऐकला होता पण तो फक्त गाण्याचा कार्यक्रम होता. पण मला गाण्याच्या ऐवजी सिनेमातला सीन दाखवायला आवडेल असं वाटलं. माझं सिनेमातलं ज्ञान इथे उपयोगी पडलं. मी तसेही भरपूर सिनेमे बघते. या कार्यक्रमासाठी प्रभातचे सगळे सिनेमे बघितले आणि अडीच तासाच्या सिनेमातले महत्त्वाचे प्रसंग जे १५ मिनिटात स्टेजवर सादर करता येतील असे मी निवडले आणि त्या प्रमाणे संहिता लिहिली. या कार्यक्रमात काम करणारे सगळे कलाकार न्यू जर्सी-पेनसिल्व्हेनिया भागातले आहेत. स्टेजवर २४ कलाकार असतील. या कलाकारांचे कपडे पण ब्लॅक अँड व्हाईट असतील त्यामुळे प्रभातच्या सिनेमाचा तो फील या कार्यक्रमाला असेल. अयोध्येचा राजा, संत तुकाराम, धर्मात्मा, संत ज्ञानेश्वर, कुंकू, माणूस, शेजारी, रामशास्त्री या सिनेमांवर आधारित सीन आपल्याला बघायला मिळतील.

**नीता:** हे सगळं ऐकून असे वाटते की प्रभात कंपनीच्या इतिहासाची तुतारी पुन्हा थोड्या वेळाकरता पुनर्जीवित होणार आहे. तुम्ही तुमच्या व्यस्त schedule मधून आमच्यासाठी वेळ काढून इतकी मनोरंजक माहिती दिली त्याबद्दल मनःपूर्वक आभार व २०२४ च्या अधिवेशनातील कार्यक्रमासाठी बृ. म. मं वृत्त टीम तर्फे तुम्हाला खूप खूप शुभेच्छा! देव करो आणि असे बरेच कार्यक्रम प्रेक्षकांना बघायला मिळोत!!


**विदुला कोल्हटकर, बाल्टिमोर, मेरीलँड**
Vidula.Kolhatkar@bmmonline.org

**नीता धोपेश्वरकर, पार्सीपनी, न्यू जर्सी**
Neeta.Dhopeshwarkar@bmmonline.org







बृहन्महाराष्ट्र मंडळ संमेलन
San Jose, CA | June 27-30, 2024
अन्न हे पूर्णब्रह्म!
प्रत्येक जेवणाचे अभिनव सूत्र!
दवडू नका वेळ तुम्ही तिळमात्र!!
लग्नाची पंगत, गंमत जम्मत!
अळू नि मठ्ठा
जिलबीचा घास
नवरोबा पठ्ठा
तर नवराई खास ॥
शेजारी सख्खे, जेवणात पक्के!
कचोरी, ढोकळा
गोवन आमटी
गट्टे की सब्जी
नि उंधियो सुरती ॥
मराठी स्वाद, आईची याद!
बटाटे वडा
मोदकही वाढा
मालवणी चिकन आणि
फिश कोळीवाडा ॥
काय बे theme,
सगळ्यात supreme!
Chinese, Thai
Mediterranean
तुर्की ,Mexican
आणि Italian ॥
BMM चे अधिवेशन पक्वान्नांचा थाट
तुमच्यासाठी तयार आहे सुग्रास ताट !!
काय बे!
BMM2024
www.bmm2024.org
#KaayBay
#BMM2024 #BayMarathi

# Elevate Your BMM2024 Experience

## Introducing Premium Seating Upgrade & Day Pass

We've heard your feedback and are thrilled to announce new pricing options starting April 22nd that many of you have eagerly awaited! Secure your premium seats or grab a day pass today and join us as we celebrate our rich Marathi culture.

With less than 70 days remaining until the 21st BMM 2024 Convention, we are preparing to welcome over 5500 attendees from June 27 to June 30, 2024, at the San Jose Convention Center in California.

### Day Pass Information:

- Day passes cover all events for the selected day. Please note, convention meals are not included but food trucks will be available.
- Interested in attending all three days? Consider our Combo Day Pass for full access.

### Upgrade Your Experience:

- Enhance your general admission ticket to a Premium or Donor package. Interested? Contact us at fundraising@bmm2024.org for more information.
- Already have a general ticket? Upgrade to premium seating by simply paying the difference, plus a small 2% processing fee. Send your upgrade request with your Name, T-code, or M-code to updatebooking@bmm2024.org.

| Day2<br>Friday, June 28 | Day3<br>Saturday, June 29 | Day4<br>Sunday, June 30 | Combo 3- Day Pass<br>Friday - Sunday<br>June 28 - June 30 |
|---|---|---|---|
| $150 | $150 | $150 | $350 |

Join us for a memorable event filled with engaging activities, entertainment, and endless opportunities to connect with the community. Enjoy around-the-clock refreshments and eight gourmet meals planned over the event duration.

Don't miss out — over 4000 have already registered! Secure your spot today and ensure you're part of this incredible gathering.

> चला तर मग, लवकरच भेटू!
> तुमच्या सेवेस सज्ज, तुमचीच,

**Best Regards,**
**BMM2024 Convention Team**

**Premium Seat Benefits:**

- Seating Priority: Enjoy front-row access in the Premium Seating Zone, right after the exclusive sofa/donor zone.
- Food Priority: Get first-in-line access at all food venues.
- Hotel Priority: Book your stay at prime hotels within a 0.5-mile radius of the convention.

| Benefits | General Tickets |
|---|---|
| Cost of Package | 750 |
| No of Tickets | 1 |
| Seating | Premium Chair Seating Zone |
| No of Banquet Tickets | N/A |
| Hotel Room | Add on |
| Hotel Type | Vicinity* |
| Day 1 (BMM Fest) | Add on |
| Food | Priorty in Food Line |

Please note that your general ticket is eligible for an upgrade to a donation package.

For more details visit https://bmm2024.org/individual-donor-packages and to upgrade, please email fundraising@bmm2024.org.

REGISTER NOW

#BayMarathi
#BMM2024
#KaayBay
www.bmm2024.org

**BMM CONVENTION**
**San Jose Conventions Center, CA, 27-30 June 2024**


#BMM2024
Day 1
बृ.म.मं. उत्सव
• उत्तरंग - पूर्ण दिवस
• उद्योजक सत्र - पूर्ण दिवस
• वैद्यकीय सत्र - पूर्ण दिवस
• एकांकिका स्पर्धा - पूर्ण दिवस
• शाळा आणि जागतिक मराठी संस्था
संध्याकाळचे प्रमुख कार्यक्रम
• देणगीदारांसाठी मेजवानी
• "सारेगम" संगीत कार्यक्रम- भारतातील गायक आणि वादकसंच (कौशल इनामदार, अनिरुद्ध जोशी, आशिष कुलकर्णी, नचिकेत लेले, मधुरा पाध्ये, मृण्मयी फाटक, सत्यजित प्रभू, प्रसाद पाध्ये, रितेश ओहोळ, अमर ओक, अभिजित भदे, निलेश परब)
Day 2
बृ.म.मं. अधिवेशन उद्घाटन समारंभ
• स्वागताचे भाषण: BMM अध्यक्ष श्री. संदीप दीक्षित आणि निमंत्रक श्री. प्रकाश भालेराव
• Dreams Unlimited! स्वप्नांची "बे"फाम भरारी. सौ. निर्मल गोसावी आयोजित बे एरियातील कलावंतांचा कार्यक्रम
अधिवेशनाचा विशेष कार्यक्रम
• मराठी पाऊल पडते पुढे: श्री. राज ठाकरे यांची मुलखात
संध्याकाळचा प्रमुख कार्यक्रम
• मेलांज ऑफ मेलडीझ - श्री. राहुल देशपांडे व श्रीमती प्रियांका बर्वे
भारतातील कार्यक्रम
• जसरंगी (पंडित संजीव अभ्यंकर, विदुषी अश्विनी भिडे-देशपांडे)
• मराठी संत परंपरा (ह.भ.प. चारुदत्त आफळे, शरद पोंक्षे, भगवान रामपुरे, अभिषेक काळे)
• हिंदू धर्म...म्हणजे नक्की काय? (श्रीमती धनश्री लेले)
• सुखाचा पासवर्ड (श्री. प्रल्हाद पै)
उत्तर अमेरिकेतील कार्यक्रम
• मल्लखांबाचे प्रात्यक्षिक (नामवंत आंतरराष्ट्रीय कलाकार )
• AI करेल ना बे (अमेरिकेमधील प्रख्यात शास्त्रज्ञांचा परिसंवाद)
• राम-धनु (पंडिता अर्चना जोगळेकर आणि शिष्यांचा कथक नृत्याविष्कार)
• माकडाच्या हाती शॅम्पेन (विनोदी नाटक, NEMM)
• मन रे इंद्रधनू (श्रीमती हेमालिका गोंधळेकर प्रस्तुत संगीतिका
• StandUps Unlimited! (अमेरिकेमधील विविध कलाकार )
• एकांकिका स्पर्धेमधील पहिल्या २ विजेत्या एकांकिका
बृ.म.मं. स्पर्धा
• विविध प्रकारच्या आणि वयोगटामधील नृत्य स्पर्धा
बृ.म.मं. युवकांचे कार्यक्रम - तपशील नंतर येतील
• IceBreaker and Speed Dating
• इंजिनिर्स आणि डॉक्टर्सच्या पलीकडे: पराग मराठे, ओमी वैद्य यांच्याबरोबर अनौपचारिक गप्पा
• टॉप गोल्फ मध्ये जेवण आणि खेळ (अतिरिक्त शुल्क लागू, नवकरच सर्व माहिती मिळेल)
Day 3
बृ.म.मं.- विशेष कार्यक्रम
• ज्ञानेश्वरी: प. पू. स्वामी गोविंदगिरी महाराज यांचे व्याख्यान
अधिवेशनाचा विशेष कार्यक्रम
• साता समुद्रापार : श्री. गौर गोपाळ दास यांचे प्रबोधन
संध्याकाळची संगीत मेजवानी
• अजय अतुल व २५+ नामवंत वादक आणि गायक
भारतीय कार्यक्रम
• भाडिपा जगात भारी (सारंग साठ्ये, पॉला मॅकग्लीन)
• प्रिय भाई... एक कविता हवी आहे (मुक्ता बर्वे आणि सहकलाकार)
• ज्योतिषातील गमती जमती (श्री. संदीप अवचट)
• मनाचे आरोग्य (डॉ. आनंद नाडकर्णी )
उत्तर अमेरिकेतील कार्यक्रम
• बे एरिया मधील कलावंताचा कलाविष्कार (गायन व वादन)
• TV2OTT: Seattle महाराष्ट्र मंडळाची अप्रतिम संगीतिका
• प्रभात सिनेदर्शन (कलाभवन संस्थेची प्रस्तुती)
• बहुरंगी बहुढंगी लावणी (मोहन रानडे प्रस्तुत अमेरिकेमधील नामवंत कलाकार)
• Mystic Healing Through Vedas (श्रीमती मधुवंती भिडे आणि युवा कलाकार)
• जीवाचा मेटापिटा (श्री.ओंकार कऱ्हाडे यांचे विनोदी कथाकथन)
• मुद्रा (श्रीमती राधा बगे यांचे कथाकथन)
बृ.म.मं. युवक-कार्यक्रम
• नवीन उद्योगाचा प्रस्ताव आणि त्याचे विश्लेषण
• चला पाश्चिमात्य नृत्य शिकुयात!
• Fashion Show : सर्व वयोगटांसाठी!
बृ.म.मं. स्पर्धा
• ढोल ताशा स्पर्धा
• सुगम संगीत स्पर्धा
• शास्त्रीय संगीत स्पर्धा
बृ.म.मं. उत्सव
• रेशीमगाठी (भाग १ आणि २)
BMM2024
Day 4
अधिवेशनाचा समारोप सोहोळा
• निमंत्रक श्री प्रकाश भालेराव आणि BMM अध्यक्ष संदीप दीक्षित ह्यांचा अधिवेशनाचा आढावा व निरोपाचे भाषण
अधिवेशनाचा विशेष कार्यक्रम
• प्रख्यात क्रिकेटपटू श्री सुनील गावस्कर यांचा जीवन गौरव पुरस्कार सन्मान सोहळा व त्यांची अविस्मरणीय मुलाखत!
अधिवेशनाच्या समारोपाचा कार्यक्रम
अभंगवारी: विविध कलाप्रकारांचा अप्रतिम संगम!
• श्री. महेश काळे (प्रख्यात गायक)
• श्री. अच्युत पालव (प्रख्यात अक्षरलेखन कलाकार )
सर्वांना महाप्रसाद देऊन अधिवेशनाची सांगता होईल
अधिवेशन समाप्ती!
Register at:
https://bmm2024.org/register/
June 27th - 30th, 2024
San Jose Convention Center, California

## ललत ते बागेश्री - एक सांगितीक आठवण

हैद्राबाद शहर बघायचे हे बरेच दिवसांपासूनचे मनात होते, शेवटी तो योग आला. माझी मैत्रीण अलका, तिचे घर हैद्राबादला होते तेव्हा तिच्याबरोबरच मी हैद्राबादला आले होते. पोहोचायला बरीच रात्र झाली होती तेव्हा सकाळी आपसुकच लवकर उठावेसे वाटत नव्हते आणि भल्या पहाटे शांत पण गंभीर सुरावटीने जाग आली. वाटत होते की कोण एवढ्या भल्या पहाटे ललतचे सूर आळवत आहे? पहिले तर कळेनाच कुठे आहोत आपण. कोमल रे~~ खुपच कोणीतरी आळवून आळवून गात होता आणि त्या बरोबर तीव्र म आणि निषाद हे ऐकून तर झोपच उडाली.

मला जागे झालेले पाहून अलका झोपेतच होती तरी मला म्हणाली, "झोप अजून, आज काही कुठे जायचे नाही." तेव्हा मी विचारले "कोण गात आहे?" त्यावर हलकेसे हसून अलका म्हणाली, "आमच्या शेजारी राधामावशी, त्यांचा रियाज चालला आहे. आता तो आमच्या जीवनाचा भाग झाला आहे. राधामावशींच्या रियाजाचा आवाज ऐकला नाही तर आम्हाला कोणालाच चैन पडत नाही". हे म्हणत असताना अलका म्हणाली, "मला बोलायला लावून माझी पण झोप घालवलीस न? चल आता, राधामावशींकडेच जाऊ, आणि त्यांच्या समोर बसूनच ऐकू." मला तर ही पर्वणीच वाटली लगेच ५ मिनिटात तयार होऊन आम्ही दोघी शेजारी राधामावशींकडे गेलो. दार तसे लोटलेलेच होते. हळूच आवाज न करता आत गेलो. तरी पण राधामावशींना चाहूल लागलीच. तंबोऱ्याच्या साथीने त्यांचा रियाज डोळे मिटून चालता होता, डोळ्यांनीच त्यांनी अलकाला बसायला सांगितले आणि परत डोळे मिटून रियाज करण्यात त्या दंग झाल्या. मला तर ही माझी ट्रिप नशिबाचाच भाग वाटत होती. रियाज ऐकता ऐकता मी माझ्याच विचारात, आठवणींच्या राज्यात कधी गेले ते मलाच कळले नाही.

मी मला माझ्या लहानपणीच्या काळात पाहत होते. आई सकाळी सकाळी तिचा रियाज करायची आणि मी झोपेत असताना मला आईचे सूर कानावर आले की झोपेतून उठून बाहेरच्या खोलीत येऊन आईच्या मांडीवर डोके ठेऊन परत झोपून जायचे. आई पण एका हाताने मला थोपटत तिचा रियाज चालूच ठेवायची. तर अश्या छान सूरमय वातावरणात माझी सकाळ सुरु व्हायची. ही पहाटेची वेळ असायची. आईचा रियाज संपता संपता उठायची वेळ व्हायची. त्यासाठी घड्याळाचा गजर लावायची गरज कधीच भासली नाही. आईचा रियाज संपला की उठायचे, आवरायचे आणि शाळेला जायचे हे ठरलेले असायचे. दुपारी शाळेतून आल्यावर, प्रथम आईने करून ठेवलेले खायचे, थोडा अभ्यास करायचा, आणि तोवर आईचे पण काम आवरायचे. त्यानंतर आई माझ्याकडून रियाज करून घ्यायची. आता ते आई बरोबर घालवलेले क्षण फारच मोलाचे वाटत होते. आईची फार इच्छा होती की मी पण तिच्यासारखे गायन हा प्रांत स्विकारावा. तशी मी थोडी थोडी तयार होत होते. पण आई बरोबर गायचा योग आला नाही. त्या अगोदरच आई या जगातून निघून गेली होती. अजूनही मला यावर विश्वास बसतच नाही की आता आई या जगात नाही. त्या विचाराने मनाला परत एक धक्का बसला. त्यामुळे विचारांच्या तंद्रीतून जागी झाले. समोर राधामावशींचा रियाज चालूच होता. अलका पण तितक्याच तन्मयतेने ऐकत होती. नकळत मी राधामावशी मध्ये आईला पाहायला लागले. त्या विचाराच्या तादात्म्यतेतच मी ऐकण्यात दंग झाले.

थोड्याच वेळात राधामावशींचा रियाज संपल्यावर लगेचच, आम्हाला कॉफी घेता का म्हणून स्वयंपाकाच्या दिशेने निघाल्या. हे सगळे पाहून परत राहून राहून मला आईच समोर वावरत आहे, असे वाटत होते. राधा मावशींनी केलेली कॉफी घेता घेता त्यांच्याशी गप्पा मारू लागलो. त्यांना माझ्या गाण्याच्या आवडीचे कौतुक वाटले, तेव्हा अलका म्हणाली मावशी, हिची आई मोठी गायिका होती आणि ही पण छान गाते. लगेच राधामावशी म्हणाल्या "मग काही म्हणून दाखवतेस का?" मी लगेच आई ललत रागातील जी चीज म्हणायची, ती म्हणून दाखवली. ती ऐकून मावशी खुपच खुश झालेल्या दिसल्या. नशीबानेच मला इथे हैद्राबादला या राधामावशींनाच भेटायला आणले असे वाटायला लागले. नंतर ३-४ दिवस मी हैद्राबाद मध्ये होते. पण माझा बहुतेक वेळ राधामावशींबरोबरच त्यांचा रियाज ऐकण्यात आणि काही काही वेळा त्यांना आईने जे शिकवले ते ऐकवण्यात गेला. परत निघताना मी त्यांना पुण्यात यायचे आग्रहाचे आमंत्रण दिले.

परत पुण्यात आल्यावर मी आणि अलका आपापल्या कामात दंग झाल्या. एके दिवशी राधामावशींचा फोन आला की पुढच्या आठवड्यात माझा पुण्यात कार्यक्रम आहे, तर तुमच्याकडेच येते. मी आणि अलका पुण्यात जागा शेअर करून राहत होतो. आम्ही सगळे घर आवरायला सुरवात केली आणि राधा मावशींच्या स्वागताची तयारी सुरू केली. पुण्यात आल्यावर राधामावशींनी मला सांगितले की "उद्या तू माझ्याबरोबर गाणार आहेस!" मी आतून दचकलेच, मी आणि गाणार, ते पण स्टेजवर? त्याचक्षणी आईची इच्छा आठवून मला अश्रू आवरले नाहीत. मनातून वाटत होते हे काय घडत आहे. आई तर

घडवून आणत नाही ना. मग नंतर कळले की अलका बोलता बोलता राधामावशींना माझी आई, तिची इच्छा या बद्दल बोलली होती. आईची इच्छा पूर्ण करण्याची हीच वेळ आहे ही मनाशी खूणगाठ बांधून मी थोड्याच वेळात राधामावशी बरोबर रियाज करण्यास सुरवात केली.

राधामावशींनी बागेश्री राग म्हणायचे ठरवले होते. हा आईचा पण आवडीचा राग होता. दुसऱ्या दिवशी शेवटी तो क्षण आला. राधा मावशी बरोबर बागेश्री राग आळवत असताना मी आईलाच समोर पाहत होते. सा म, नि ध, ध म , म ध , ध नि, ध म , म प ध, ग , म ग रे सा , नि़ सा , स्वरविस्तार करता करता मींड घेऊन रागाचे चलन समोर येत होते, त्या बरोबरच आई म्हणत असलेला म ध हा चा ठेहराव आठवत होता. शेवटी मैफील संपवताना मी स्टेजवरच राधामावशींच्या पाया पडले आणि आज तुमच्यामुळेच मी आईचे स्वप्न पूर्ण करू शकले हे म्हणत कृतज्ञता व्यक्त केली. हे सगळे ऐकून प्रेक्षक पण खुश झालेले दिसले. ह्या सगळ्या प्रसंगामुळे माझ्यात आणि राधा मावशीं मध्ये एक अनुबंध तयार झाला.

त्या दिवशी हैद्राबादला ललत रागाचा रियाज ऐकला आणि त्यामुळे हा क्षण दिसला हे तर निश्चितच होते. पुढच्या सांगितिक प्रवासामध्ये बरेच महत्त्वाचे, साजरे करणारे क्षण आले पण ही सांगितिक आठवण मनात घर करून गेली होती, आईचे स्वप्न साकार करुन गेली होती.

**उत्तरा भालेराव, टॅम्पा फ्लोरिडा**
uttarab@hotmail.com

## क्लिक

रेवती थोडीशी दुखावली गेली होती. तिला आज काही सुचत नव्हतं. मागचा आठवडा तिचे मन जरा खुशीत होते. आज एकदमच अशांत होऊन गेल होते. गेली दोन तीन वर्ष ती अमरच्या लग्नासाठी प्रयत्न करत होती. आधी तो काही बोलायलाच तयार नसायचा. I will find on my own हे त्याच टिपिकल उत्तर असायचं "अरे पण शाळा कॉलेज मध्ये कोणी भेटली असती तर ठीक होते. आहे का कोणी मैत्रीण?" रेवाच्या ह्या प्रश्नाला no चे उत्तर असायचे," अरे मग आता कुठे भेटणार आहे तुला" नंतर हे संभाषण नेहमीच रागवा रागवीत जायचे. पण हल्ली "तुला बरी वाटली एखादी तर सांग मला. मी भेटीन तिला. पण अमेरिकेत वाढलेलीच पाहिजे हं. भारतातल्या मुली मुळीच नको. त्यांना मैत्री वगैरे नकोच असते, direct सेलेब्रेशनचेच प्लॅन्स सुरू होतात त्यांचे." त्याला सांगूनच तिने त्याचे नाव एका website वर टाकले होते. रुही सुद्धा त्यांच्या एका मैत्रिणीच्या ओळखीची होती. तसे सगळं व्यवस्थितच होते. वय, उंची, शिक्षण सगळं जुळले होते. फारसे लॉन्ग डिस्टन्सही नव्हते. दोन चारदा फोनवर बोलणेही झाले त्यांचे. त्यामुळे आता प्रत्यक्ष भेटतील असच तिला वाटत होते. आणि आज अमर ने तिला सांगितलं कि "It did not click. She is good as a friend but not a wife type" - "अरे म्हणजे काय?", ती एकदम nervous होऊन गेली होती. "Friend झाल्याशिवाय बायको होताच येत नाही रे अमर. बायको हि क्षणाची पत्नी आणि अनंत काळाची friend च असावी लागते. म्हणे क्लिक झाले नाही!"

"आणि अमर, आत्ता क्लिक झाली तरी, पुढच्या आयुष्यात कितीतरी वेळा शॉर्ट सर्किट होऊन फ्युज जाणार आहे आणि तेंव्हा डागडुजी करून क्लिक करावं लागतच परत. तुला माहितीच आहे मी किती बडबडी आहे ते आणि माझ्या उलट बाबा अगदी शांत. He is happy in his study room reading. आणि मला शांतता सहनच होत नाही. एकटी असले की कोणालातरी फोन लावणार नाही तर TV सुरु करणार. सुजयकाकाला शास्त्रीय संगीत किती आवडते, पण मेधामावशीने स्पष्ट नकार दिला होता ते शिकायला. माधुरी दीक्षितच बघ ना तिचा नवरा एकदम उलट त्याच्या घरी एकही हिंदी सिनेमा लागत नाही. प्रत्येकजण आपापल्या जगात सुखी असतं कारण त्याला माहित असतं की आपल्या पाठीशी एक भक्कम जोडीदार आहे, भले तो silent partner असेल. थोडीशी adjustment सगळ्यांनाच करावी लागते. एकदा आपले म्हटले कोणालाही की सगळं successful होतच, फक्त जिद्द असावी लागते साथ देण्याची - सुखात दुःखात आणि कुठल्याही कठीण प्रसंगात".

"आयुष्य नेहमीच रोमँटिक नसतं अमर. ते कर्तव्य आणि जबाबदाऱ्यांच्या खडतर रस्त्यावरून एकमेकांचा हात धरून चालायचं असते. स्पार्क आणायचा असतो, जीवनात क्लिक व्हावं लागतं दुसऱ्याशी. तुला आयुष्यात हिरवळ आणायची असेल तर दुसऱ्यासाठी ओॲसिस बनावं लागेल. विचार कर आणि आयुष्याला वळण लागावं अस वाटत असेल तर ही वेगळी वाट पकड आणि सुरळीत आयुष्य सुरु कर".

**कल्पना किर्तने**
kalpanakirtane@yahoo.com



India's Most Preferred
Medical Destination
Welcome to our internationally renowned medical facility, offering one-of-its kind integrated world-class healthcare services that blends state-of-the-art 21st century technology with an upscale luxury atmosphere.
INFRASTRUCTURE
Over 50 years of service to humanity
800 Bed multi-speciality Tertiary Care Referral Hospital with 150 intensive care Beds.
300 specialists / super specialist consultants
750 panel doctors & 1500 paramedical staff
Team of over 4000 employees | Network of 3 hospitals & 22 Diagnostic Centres
Four Cathlabs, 20 Operation Theaters
03 Linear Accelerators | Cyberknife S7 | Digital PET CT & Digital SPECT CT
Bi-Plane CathLab | Hybrid Cath Lab | Cyclotron
3 Tesla MRI Scan with Broadband facility
14 MRI Machines | 6 CT Scanners | College of Nursing for B.Sc. & M.Sc.
Grant Medical Foundation
Ruby Hall Clinic
Sassoon Road | 40, Sassoon Road, Pune 411001
Wanowrie | 59/6, Azad Nagar, Wanowrie, Pune - 411040
Hinjawadi |Rajeev Gandhi Infotech Park, MIDC, Phase No 1, Plot No P-33, Hinjawadi, Pune – 411057
Call : 020-6645 5100 | Visit us : www.rubyhall.com | Follow us




DPLMF
Dr. Parnerkar Life Management Foundation
Enable human life to achieve goals and derive joy & satisfaction while living a complete life.
About us
A nonprofit organization - 501(c)(3) , working for the people of the USA.
Open for everyone (people of all colors, ethnicities, religions, ages, genders etc.)
Philosophy and inspiration from Dr. R.P. Parnerkar, an intellectual and spiritual giant from India who propounded the concept of 'Life Management'.
The foundation is formed by individuals in North America, who have greatly benefited from their association with Dr. R.P. Parnerkar and Adv. Dr. V.R. Parnerkar.
Core values
Pursuit of excellence
Meticulous planning
Ability to engage with people
Social norms
Relevance of times
Spiritual aspects of life
Contact
Life management center & Office
11285 Elkins Road #H-4
Roswell GA 30076
Email : info@dplmf.org
Web : www.dplmf.org
Follow : www.facebook.com/DrPLMF






बेडेकर
BMM सोहळ्याला
बेडेकर हवेतच!
मान आणि मन जपणाऱ्या आपल्या पदार्थांसह
बेडेकर घेऊन येत आहेत तीच चव, तीच अनुभव!
www.vpbedekar.com
bedekar.sales@gmail.com





isha tours
Lets explore the new world...
Celebrating 21 years
Glorious
Ladakh
Unforgetable Journeys .....
Create Timeless Stories
At ISHA TOURS we pride ourselves on being the pioneers of group and family tours to many off beat and exotic locations around the world. We have introduced a multitude of interesting experiences to our guests while ensuring safe travel, comfortable stays and local participation. From Japan in the East to the USA in the West with Some beautiful countries in Asia, Europe and Africa to match.
We promise simple yet special experiences. In the beautiful Indian Locales of Kashmir Himachal, North East India and of course Ladakh we have options to suit every Age, Pocket and Mindset to make sure you come back with a horde of Happy memories.
DOMESTIC & INTERNATIONAL ATTRACTIONS
Bhutan
Kenya - Tanzania
Scandinavia - Northern Lights (Finland, Sweden, Norway)
Eastern Europe
Europe (Tulip season)
London, Scotland, Ireland
Scandinavia (Summer)
Iceland • Japan
Myanmar • Borneo
Vietnam - Cambodia
Philippines • Bali
Azzerbaijan - Kazakhstan
Namibia, Botswana, Zimbabwe • Morocco
Madagascar Reunion
Andaman
North East India (Assam, Arunachal, Meghalaya, Nagaland)
Kinnaur - Spiti
Offbeat Himachal (Lahaul & Tirthan Valley)
Kashmir Tulip
Offbeat Rajasthan
Madhya Pradesh
Varanasi (Lucknow, Ayodhya, Prayagraj)
Statue of Unity ( with Vadodara)
Greater Rann of Kutch
Indian Wildlife Tours
Tadoba, Sundarban, Tipeshwar, Pench, Kanha, Nagzira, Ranthambore, Jawai Bandh-Bharatpur, Panna
www.ishatours.net 9320031910 info@ishatours.net
Head Office : Thane -1 A / Murlidhar Soc., Bramhan Society, Naupada, Thane (w). 9320131910
Dadar : 9320231910, 9137809671 Borivali : 9324531910 Pune : 9422870773


YOUR FAVOURITE
INDIAN DELIGHTS
ARE HERE!
Chitale
BANDHU
-AMERICAS-
Become a distributor and help us spread the rich taste of Chitale products across the USA and Canada.
SPECIAL CHIVDA
BANANA CHIPS
SHANKARPALI
BANANA CHIPS
Let's connect: enquiry@chitaleamericas.com


KOTIBHASKAR
आम्ही मनात घर करतो
YOUR GATEWAY TO PREMIUM LIVING!
KOTIBHASKAR
Established in 1982 at Sangli
Over four decades legacy
Commitment to excellence
Unwavering trust and quality
Spread over: Pune - Prabhat Road, Mayur Colony, Ideal Colony, Kothrud, Karve Nagar
Sangli - Warnali, Vijaynagar, Vishrambaug
Join us as we innovate and exceed expectations, crafting spaces that bring dreams to life.


KPIT
CUTTING-EDGE
TECHNOLOGY
COMPANY
Reimagining
Mobility across the
Globe, creating a
Cleaner, Safer &
Brighter World
kpit.com


Luxurious
Beach Vacation Homes
Welcome to Mango Village, Guhagar!
Mango Village Guhagar
Call : +91 98200 16056
contact@mangovillage.in
www.mangovillage.in
Let's get back to nature


OUR VALUES SHINE MORE THAN GOLD!
1832
The year that marked the birth of a brand that was going to make its home in every Maharashtrian's heart. PNG Jewelers, a brand that has witnessed happy moments of millions and is still tied with them through TRUST, PURITY, TRADITION, LEGACY and PROMISE.
PNG
JEWELERS
PASS ON HAPPINESS
P N Gadgil Jewelers
Now Purchase Your Jewelry From Anywhere In USA
On Facetime / Videocall, Contact Us : 408-245-6764
PNG Jewelers, 791 E El Camino Real, Sunnyvale CA 94087
http://www.pngjewelers.com


ravetkargroup.com
आठवणींची सम
आयराआयरीत कपाटातून दोन घुंगरू घरंगळत आले
अन् बघता बघता मी कोथरूडातल्या माझ्या नाचाच्या
क्लासवर जाऊन पोहोचले. छोटुकली घुंगरांची बँग
छुमछुम वाजवत बाबाचं बोट धरून मी क्लासवर जायचे.
क्लास झाला की थेट वनाज कॉर्नरवर पाणीपुरीवाल्याकडे...
माझा क्लास सुटून बराच काळ सरला.
ठेल्याचं आता दुकानही झालंय म्हणे!
सगळं अगदी झर्रकन बदलत गेलं.
कोथरूडचं रूप पालटलं, पण तिथून जातांना
ऐकू येणारा घुंगरांचा नाद, लेकीची वाट पाहणारा
बाबा आणि पाणीपुरीवाल्याची शेवटीची खास
मसालापुरी आजही आठवणींना समोर आणतात...
रावेतकरांकडे आजच बुक करा,
तुमच्या अशा अगणित आठवणींना जपणारं,
तुमचं हक्काचं घर!
Ravetkar
*T&C Apply
Janhavi
2 & 3 BHK Homes at Lokmanya Colony, Kothrud
Starting ₹1.25 Cr*
THE MAKERS OF DIVERSE ADDRESSES 34 Completed Projects 10 Ongoing Projects 11 Popular Locations
+91 7030 432 432 020 2951 8668, 020 2566 1012/13 ravetkargroup
Corporate Office: 1 Suneet, Plot No. 100 B 1/1, Near NFAI, Prabhat Road, Erandwane, Pune 411004
P52100028769


Pitambari
INNOVATIVE PRODUCTS
Klenz POWERWASH
Pitambari
Kanthacare
Hexa Shine
Arishakti
Saptarshi - Atri 7 in 1
Gomay
Ruchiyana
Wada Kolam

**NAMASKAR**

Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status. An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape. India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive.

We welcome repatriation of after-tax sales proceeds of realty by US Citizens of Indian origin. We will honor remittance of tuition fees by parents to colleges in the USA for their children from India.

**FSC is the answer.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org", for more detail.**

**Or email to Admin@SmallCharity.Org .**

You will hear from Ramesh Sarva, CPA, 183 Broadway, #210, Hicksville NY 11801

## Join Donor List:

JAGDISH & SHUBHANGI THAKUR
RAVI & NILIMA BHIRUD
RAHUL & PUNAM MUTHA
KOTESWARA RAO KUNDA, MD
KIRAN& NNDINI JOAG
KISHOR DANDEKAR
SUBHASH & VASANTI PURANIK
SUHASINI JOSHI
KAMLAKAR &ARUNA PENDSE
PRAMILA SARVA
VIJAY NARINGREKAR
MUKUND & SHAILA DIDOLAKE
GOVIND & BHAKTI NADKARNI

SHARAD PANJAPE
KAMALAKAR PENDSE
SUHASINI JOSHI

SWAROOP YOG & OTHER CHARITIES
M. KARVE FONDN 16 NEW GIRLS EDU
ANAND RISHI Hosp. C T SCAN
EDUCATIONAL FOUNDATION, A.P.
V.T. PATIL FOUNDATION
AMPTE FOUNDATIO
CASP, V.S. SAMITHI, PUNE, PATHAK RST
KOSMIC BEATS
ATHASHREE
ADHAR
EDUCTION
AKKA DHOPESWAR MAHILA MANDAL
SHANTA DUEGA TEMPLE, KAVLEM, GOA
LD ENGG COLLEGE, LIBRARY REDEVALOPMENT
ATHASHREE, IMROVE FACILITIES FOR SENIORS
ATHASHREE
COSMIC BEATS

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

|| मराठी तितुका मेळवावा ||

**Subscription Remittance Address:**

**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

**Reshimgathee**

नाते जुळते मनाशी मनाचे



A BMM Matrimonial initiative for Maharashtrians in North America

https://reshimgathee.bmmonline.org/

BMM मराठी शाळा

Five-level “Marathi Language Learning” progressive curriculum, study guidelines and supporting materials.

The BMM-Bharti Vidyapeeth’s joint certificates for “Marathi Bhasha” examinations after successful completion of each level and passing criteria.

For BMM Marathi Shala inquiries
Email : Shala@bmmonline.org

https://bmmshala.net/

## स्कूल बस (भाग - २)

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सेन कुकीजचा एक बॉक्स आणि फुलांचा बुके घेऊन आदल्या दिवशी भेटलेल्या बाईच्या घरी गेली. अपार्टमेंट १२४ ची बेल वाजवली. एका गृहस्थाने दार उघडलं.

"इंतिरा आहे का? मला त्यांना भेटायचं होतं. मी सेन."

"काय काम आहे? ती कोणाला भेटत नाही. म्हणजे ती झोपली आहे." तो गृहस्थ सारवासारव करत म्हणाला.

"मी काल स्कूल बसच्या वेळेत येऊ शकले नाही. मला लेट झाला होता. तेव्हा इंतिरा माझ्या ७ वर्षाच्या मुलीजवळ, मी येईपर्यंत थांबून राहिली होती. म्हणून मला तिचे आभार मानायचे होते. मी तिच्यासाठी ह्या थोड्या कुकीज आणल्या होत्या."

त्या माणसाला कालचा हा प्रसंग माहित नव्हता असं वाटत होतं. ह्यावर त्याला काय बोलावं ते सुचत नव्हतं. त्याच्या चेहऱ्यावर कमालीचं आश्चर्य दिसत होतं. त्याने एकदा मान वळवून आतला कानोसा घेतला. त्याने कदाचित इंतिरा झोपली आहे ना, तिला आवाजाने जाग आली नाही ना ह्याचा अंदाज घेतला.

"तुम्ही आत या. बसा."

सेनला पण काही उमगत नव्हतं. ती साशंक मनाने आत गेली.

लिव्हिंग रूममध्ये दर्शनी भागात एक बुद्धाची प्रतिमा ठेवली होती. त्यापुढे एक मोठी सुवासिक उदबत्ती लावली होती. त्याचा वास त्या अपार्टमेंटमध्ये दरवळत होता. शेजारीच एका बाऊलमध्ये ४-५ फळं प्रसाद म्हणून ठेवली होती. घरात त्या दोघांशिवाय इतर कोणी दिसत नव्हतं. त्या माणसाने सेनला बसायला सांगितलं.

सेनने किंचित हसल्यासारखं केलं. उभ्यानेच त्या कुकीज आणि बुके दिला. त्या माणसाने 'थँक यू' म्हणत त्यांचा स्वीकार केला.

"मी नुकतीच ह्या अपार्टमेंट कॉम्प्लेक्समध्ये राहायला आले आहे. मी एक मानसोपचार तज्ञ आहे."

त्यावर तो माणूस नुसताच 'ओके' म्हणाला. नंतर बहुधा त्यालाच कसंतरी वाटलं असावं. तो पुढे बोलू लागला.

"मी भूमिबोल सुवन्नरत. इंतिरा माझी बायको. मी तिला सांगतो तुम्ही येऊन गेलात ते."

सेन समजली की आता हा माणूस जास्त बोलणार नाही. तिने पर्समधून तिचं बिझनेस कार्ड काढलं.

"हे माझं बिझनेस कार्ड. मी डाऊनटाऊनमध्येच प्रॅक्टिस करते. ठीक आहे. मी निघते आता. गुड नाईट." असं म्हणून सेन निघून गेली.

त्यानेही 'गुड नाईट' म्हणून दार लावून घेतलं.

त्यांनतर सेनने थाओसाठी तिच्याच शाळेत डे-केअर सुरु केलं म्हणजे काही कारणामुळे तिला जरी लेट झाला तरी चिंता करायचं कारण नव्हतं. ती स्वतःच तिला डे-केअरमधून पिक अप करू लागली.

काही दिवसांनी तिच्या ऑफिसमध्ये ती नेहमीप्रमाणे पेशंट्स चेक करत होती. आधीचा पेशंट गेल्यावर पुढच्या पेशंटला आत पाठवून दे असं तिनं रिसेप्शनिस्टला सांगितलं. नवीन पेशंट आत आला. ती बघते तर काय समोर तिच्या कॉम्प्लेक्समधल्या इंतिराचा नवरा भूमिबोल. ती एक सेकंद अचंबित झाली पण लगेच भानावर आली. तिने हसून त्याचं स्वागत केलं व त्याला बसायची विनंती केली.

"डॉक्टर, कसं सांगू कळत नाहीये."

"तुम्ही इंतिरासाठी आलात ना?"

"हो. त्या दिवसापासून ती सारखं मला विचारते - ती मुलगी कशी आहे? ती कुठे गेली? मला भेटत का नाही? आणि काही वेळाने तिचं तिलाच काय होतं माहित नाही. ती एकदम रडायला लागते."

"तुम्ही मला सविस्तर सांगू शकाल का? माझ्यावर विश्वास ठेवा. तुमची पर्सनल माहिती आपल्या दोघांशिवाय इतर कुणालाही कळणार नाही."

भूमिबोलला तिच्या बोलण्याने जरा धीर आला. तो सावरून बसला. पण अचानक त्याच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. एक क्षण त्याने बाजूला बघितलं. मन घट्ट करून तो बोलायला लागला.

"एक वर्ष झालं. आमची एकुलती एक मुलगी - परीन्या सातवीत होती. मिडल स्कूलमध्ये. खूप हुशार होती ती. त्या दिवशी ती नेहमीप्रमाणे स्कूल बसने शाळेत गेली. दुपारी साधारण १ वाजण्याच्या सुमारास त्यांच्याच शाळेतला एक ड्रॉपआउट, कसला तरी सूड उगवायला शॉटगन घेऊन शाळेत घुसला. कोणत्या तरी टीचरवर त्याचा राग होता. त्या टीचरला शोधता शोधता माझ्या मुलीच्या वर्गात शिरला. तो टीचर समोर दिसताच त्याने अमानुषपणे गोळीबार करायला सुरुवात केली. टीचरला गोळी लागलीच पण इतरही ६ मुलांना गोळ्या लागल्या."

सेन श्वास रोखून ते सर्व ऐकत होती.

"डॉक्टर, अहो, त्यात दुर्दैवाने माझी मुलगी परीन्या होती. क्षणार्धात सगळं सगळं संपलं. आमचं सर्वस्व होती ती. तो गनमॅन पकडला गेला पण खूप उशीर झाला होता. किती क्रूर आहे हे सर्व!

कित्येक वर्ष हे असंच चालू आहे. आमच्या कुठल्या पापाची ही एवढी मोठी शिक्षा मिळाली?"

एवढं बोलून दोन्ही हातांनी चेहरा झाकून तो ढसाढसा रडायला लागला.

माथेफिरू लोकांचा अतर्क्य गोळीबार, त्यात निष्पाप लोकांचा जाणारा बळी, गन लॉ आणि ह्या सगळ्याची राजकारण्यांकडून चालवलेली भयानक चेष्टा हा अमेरिकेतील नित्याचा विषय असला तरी, ह्या विषयाला अशा पद्धतीने सामोरे जायला लागेल, अशी सेनला स्वप्नातही कल्पना नव्हती.

सेन अवाक् होऊन त्याच्याकडे बघत होती. तिच्याही डोळ्यांतील अश्रुंनी स्वतःच वाट शोधली होती. काही क्षण ती स्वतः एक डॉक्टर आहे हे विसरली. त्या वेळी ती फक्त एक आई होती. ती जागेवरून उठली. भूमिबोलच्या पाठीवरून हात फिरवून त्याला सावरू लागली.

भूमिबोल पुढे बोलायला लागला. "मला शाळेतून फोन आला. मी ऑफिसमधल्या मित्राला घेऊन लगेच तिकडे गेलो. नंतर हॉस्पिटलमध्ये गेलो. माझ्याच मुलीची ओळख मला पटवायला लागली. माझ्या पायाखालची जमीन सरकली होती. घरी इंतिरा एकटी होती. तिला काहीच पत्ता नव्हता आणि मी हॉस्पिटलमध्ये अडकलो होतो. स्कूल बसची वेळ झाली म्हणून ती नेहमीप्रमाणे अपार्टमेंटच्या गेटवर गेली. त्या दिवशी स्कूल बस आलीच नाही. सगळ्या पालकांना आपापल्या मुलांना शाळेतून न्यायला सांगितलं होतं. मी घाईघाईने घरी गेलो. इंतिरा गेटवरच बसून होती. तिला ही गोष्ट सांगणं निव्वळ अशक्यप्राय होतं. तिला कसंबसं घरी आणलं. ती त्या धक्क्यातून अजून सावरू शकलेली नाही डॉक्टर."

सेनच्या तोंडातून शब्दच निघत नव्हते. तिलाही हे खूपच धक्कादायक होतं. काही दिवसांपूर्वी तिला थोडा लेट झाला तेव्हा तिच्या जीवाची किती घालमेल झाली होती. इंतिराच्या वागण्याचा अर्थ तिला हळूहळू कळत होता.

भूमिबोलच्या देखील मनात साचलेलं सगळं बाहेर येतं होतं. नुसता पावसामुळे आलेला पूर नव्हता, धरण फुटल्यानंतरचा प्रलय होता तो!

"आजही ती स्कूल बसची वेळ झाली की गेटवर जाऊन बसते. परीन्या त्या बसमधून खाली उतरेल म्हणून. सर्व मुलं घरी जाईपर्यंत तिथेच थांबते. त्या दिवशी तुम्ही वेळेवर आला नाहीत तेव्हा तिचं मातृत्व काही काळापुरतं का होईना जागं झालं आणि ती तुमच्या मुलीसोबत बसून राहिली. पण जेव्हा तुम्ही आलात आणि तुमच्या मुलीला घेऊन गेलात तेव्हा ती भानावर आली की ही आपली मुलगी नाही. दुसऱ्याची आहे. घरी येऊन खूप रडली हो. तेव्हापासून सारखी तुमच्या मुलीची आठवण काढते ती. शेवटी मला राहवलं नाही आणि मी तुम्हाला भेटायला आलो."

"आय ॲम सो सॉरी, आय ॲम रिअली व्हेरी सॉरी." सेन पुटपुटली. तिला स्वतःलाही थरथरल्या सारखे होत होतं. तिने भूमिबोलला थोडं पाणी प्यायला दिलं. थोडा वेळ कोणी काहीच बोललं नाही.

"मला थोडा वेळ द्या. मी नक्की तुमची मदत करेन. ह्यावर मी विचार करते आणि तुम्हाला पुढच्या अपॉइंटमेंट बद्दल कळवते."

भूमिबोल जायला उठला.

तेव्हा सेनने त्याला विचारलं, "इंतिराला भेटायला घरी आले तर चालेल ना? आधी मला तिला विश्वासात घ्यावं लागेल. तिची मैत्रीण बनावं लागेल. मी एक करेन की मी माझ्या मुलीला तिच्यासमोर आणणार नाही."

**क्रमशः**

**अमित भावे**
amit_bhave@hotmail.com

## बृहन्महाराष्ट्र मंडळाचा प्रकल्प "वारसा", Youtube मालिका

बृहन्महाराष्ट्र मंडळाचा प्रकल्प "वारसा", Youtube मालिका

वारसा, जो वडिलोपार्जीत आलेला आणि पुढच्या पिढीला सुपूर्त केलेला असा वारसा. मराठी समाजाने उत्तर अमेरिकेत स्थलांतर करताना बरोबर आणला संस्कृतीचा, शिक्षणाचा, आठवणींचा, आशीर्वादांचा आणि मराठी मातीचा वारसा. आजचा उत्तर अमेरिकेतील मराठी समाज कोण आहे हे समजून घ्यायचं असेल तर आपण कुठून आलो, का आलो, आणि इथल्या मातीत आपली मूळे रोवून कसे भरभराटीला आलो हे शोधले पाहिजे. त्याची नोंद करून ते जतन केलं पाहिजे. अशा गोष्टी एकत्रित केल्या की सर्वांना आणि भावी पिढीला आपल्या प्रवासाची झलक मिळेल, त्यासाठी चालू केला आहे हा वारसा प्रकल्प. वारसा मालिका भाग 11 वा

**बहुरुप्याचे भारूड, राजदूत ते नटवर्य : श्री. प्रभाकर साठे,**

पुणे ते नेपाळ ते मंगोलिया ते इराण ते सॅन फ्रान्सिस्को

मुलाखत : मेधा गोडबोले



श्री. प्रभाकर साठे मूळचे पुण्याचे. कॉलेज शिक्षणानंतर त्यांनी भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयातर्फे मोठी कारकीर्द गाजवली. नेपाळ, मंगोलिया आणि इराण अशा मोक्याच्या ठिकाणांच्या दूतवासातील वरिष्ठ अधिकारी आणि राजदूत म्हणून त्यांनी फार हुशारीने आणि मेहनतीने भारताचे प्रतिनिधित्व केले. सरकारनी जाहीर केलेल्या निवृत्ती योजनेचा फायदा घेऊन १९७८ साली ते निवृत्त झाले आणि त्यांनी सहकुटूंब अमेरिकेत स्थलांतर केले. लहान वयापासून नाटक आणि संगीताची आवड असल्याने लगेचच बे एरियातील इतर कला प्रेमी लोकांना एकत्र करून Bay Area Drama Society चालू केली. नट, दिग्दर्शक, निर्माता अशा वेगवेगळ्या भूमिका यशस्वीपणे गाजवल्या. आपल्या पत्नी कौमुदी ताई ह्यांनी दिलेल्या आवाहनामुळे गेल्या शतकातील सर्व मराठी नाटकांचा अभ्यास करून “मराठी नाटकातील विनोदाचे स्थान भाग एक आणि दोन” तसेच “मराठी नाटकातील संगीताचे स्थान “ असे अतिशय लोकप्रिय झालेले प्रयोग रंगमंचावर सादर केले. त्यानंतर गीतेला संगीताचे रूप देऊन गीतेचे तत्वज्ञान सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी “गीत गीता“ रंगमंचावर आणली. त्याला मिळालेल्या उस्फुर्त प्रतिसादामुळे गीतेचे सार अगदी गावातील लोकांना कळावे म्हणून त्यांनी “ग्राम्य गीता“ ची कल्पना साकारली. साठे काका अजूनही तेवढेच कामात गर्क असतात. ते Master Gardner आहेत. ते संस्कृत, नेपाळी, रशियन, जर्मन, उर्दू भाषांमध्ये तज्ञ आहेत. ते पुरोहित असून त्यांनी १३० हुन अधिक विवाह लावले आहेत. अशा बहुगुणी व बहु रुपी साठे काकांचे भारुड ऐकुया त्यांच्याच तोंडून, वारसाच्या अकराव्या भागात “बहुरुप्याचे भारूड; राजदूत ते नटवर्य“.

वारसा मालिकेचा हा अनोखा भाग 11 वा ‘बहुरुप्याचे भारूड ; राजदूत ते नटवर्य’ पहाण्यासाठी खालील (link) क्लिक करा.
[ttps://youtu.be/ZCVQZz-LhFg](https://youtu.be/ZCVQZz-LhFg)

किंवा तुमच्या mobile phone वरून इथे दिलेला QR code scan करा. ह्या Youtube channel ला जरून like आणि subscribe करा.

Past Episodes:
[https://www.youtube.com/@bmm-varasa](https://www.youtube.com/@bmm-varasa)

## चैत्र

चैत्र महिना हा रंगांचा
निसर्गाच्या रम्य आनंदाचा!

डोलारा पोपटी पिंपळाचा
झुले झोका बहाव्याचा!

गुलाबी गारवा, टॅबुबियाचा
केशरी फुलोरा पळसाचा!

मध्येच शिडकावा बोगनवेलीचा
नखरा पहावा चाफ्याचा!

फेटा उडतो सोनमोहोराचा
सडा पडतो गुलमोहोराचा!

**चित्रा मेहेंदळे**
[camehendale@gmail.com](mailto:camehendale@gmail.com)




We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.


Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue.
The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.




**Tea Time**
Artist: Alka Vaidya
Dimension: 9″ x 13″
Medium: Watercolor
Price: $350
Mandal: MMBA of San Francisco And EBMM of SanFrancisco




**Lake Moraine Canada**
Artist: Deepa Mittimani
Dimensions: 12x24 rolled canvas print
Medium: Acrylic on canvas
Price: $150
Mandal: Calgary Marathi mandal



**Fishermen**
Artist: Pratima Lele
Dimensions: 9″ x 12″
Medium: Watercolor
Price: $250
Mandal: Marathi Vishwa



**Mauli**
Artist: Tejashree Sourabh
Dimensions:12″ x 16″
Medium: Acrylic on Canvas
Price: $350
Mandal: SAMM, San Antonio



**Luminance**
Artist: Chaitali Nadkarni
Dimensions: 11″ x 17″
Medium: Soft pastel on paper
Painting: $375
Mandal: Atlanta



**Custom Realistic Pet Portrait**
Artist: Yogini Dahiwadkar
Medium: Watercolor
Dimension: 8″ x 10″ - $200
11″ x 14″ - $249
12″ x 16″ - $299
Mandal: Baltimore Marathi Mandal

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*Buyer is responsible for shipping and handling.